# अमर्त्य सेन आणि फलटणचा माळ

प्रकाश गोळे



नोबेल पारितोषिक मिळाले आणि अमर्त्य सेन यांचे नाव सर्वतोमुखी झाले. त्यांनी लिहिलेल्या पुस्तकांची चौकशी मी पुण्यातल्या पुस्तक विक्रेत्यांकडे तीन वर्षांपूर्वी केली होती, त्या वेळी त्यांचे नाव कोणी ऐकलेलेही नव्हते. आज मात्र गरीबीच्या अर्थशास्त्राला नवा अर्थ, नवे वळण देणारा अर्थविशारद म्हणून त्यांचे नाव गाजते आहे. औद्योगिक प्रगती आणि आधुनिक शेती यांपेक्षा शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार, आरोग्य सुधारणा, कुटुंब-नियोजन व महिलांची उन्नती, या गोष्टी विकासाच्या द्योतक आहेत, या भूमिकेचा त्यांनी शास्त्रशुद्ध रीतीने आणि हिरीरीने पुरस्कार केला आहे. दक्षिण कोरिया, चीन, तैवान यांसारख्या आशियाई देशांनी या सर्व आघाड्यांवर केलेली नेत्रदीपक प्रगती त्यांनी लक्षात आणून दिलेली आहे. केरळ वगळता भारतातल्या इतर सर्व राज्यांनी वरील गोष्टींकडे दुर्लक्ष केल्याबद्दल सेन यांनी तीव्र दुःख व्यक्त केले आहे.

शिक्षण, आरोग्य, कुटुंब नियोजन वगैरेंबाबत सेन यांचा आग्रह कोणाही सुजाण भारतीयाला पटण्यासारखाच आहे. पण औद्योगिक प्रगती आणि आधुनिक शेती यांसाठी भरमसाट सवलती व अर्थसहाय्य देणाऱ्या भारत सरकारजवळ या मूलभूत सुधारणांसाठी पैसा कोठून असणार ! सद्यस्थितीत शिक्षणादी सुधारणांसाठी भारत सरकारने पैसा कोठून आणि कसा उभा करायचा ? हे सेन यांनी सांगायला हवे, असे त्यांचे लिखाण वाचताना मला सतत वाटत होते. दिल्लीमधल्या सेंटर फॉर सायन्स अॅन्ड एन्व्हायर्नमेंटचे संचालक अनिल आगरवाल यांनी तर सेन यांच्यावर टीकास्त्र सोडले आहे. भारतीय जनतेच्या पर्यावरणीय दारिद्र्याकडे सेन यांनी साफ दुर्लक्ष केल्याचा आरोप आगरवाल करतात. शिक्षण, आरोग्य, कुटुंब- नियोजन, महिलांची उन्नती यांच्याइतके महत्त्व पर्यावरणीय दारिद्र्य हटविण्यास दिले पाहिजे, असे आगरवाल म्हणतात. पर्यावरणीय दारिद्र्य दूर करण्यासाठी अशासकीय संस्था आणि संघटना यांनी देशाच्या निरनिराळ्या भागांत चालविलेल्या प्रयत्नांची भलावण आगरवाल करतात. महाराष्ट्रात वि. स. पागेंनी सुचविलेली रोजगार हमी योजना आणि अण्णासाहेब हजारे यांचा ग्रामोद्धार यांचा ते गौरवाने उल्लेख करतात. हे सारे विचार माझ्या मनात येताहेत फलटण जवळच्या एका माळावर मी उभा असताना. पावसाळा संपून दोन महिने उलटलेले आहेत. माळावरचे गवत पिवळे पडले आहे. त्याला आलेली कुसळांची टोके कपड्यांत, अंगात शिरून ठिकठिकाणी खुपत आहेत. धुरळ्याने लपेटलेली, पाऊस संपल्याने म्लान दिसणारी, बोरीची, हिवराची, नेपतीची झुडुपे आणि काड्या निवडुंग हवेतला कोरडेपणा लक्षात आणून देताहेत. पण सकाळची वेळ असल्याने वातावरण प्रसन्न आहे. धूसर, तलम आवरणात गुरफटलेली, दक्षिण क्षितिजावरची शंभू महादेव डोंगरांची रांग अतिशय मोहक आणि पारदर्शी दिसतीय्. माळावरच्या टेंगळावर उभं राहिल्याने नजरेच्या चौफेर आवाक्यात फार मोठा मुलुख येतोय्. क्षितिजावरची डोंगरांची रांग आणि तिच्या पायथ्याशी असलेल्या, सपाट माथ्याच्या बुटक्या टेकड्या सोडल्या तर हा विस्तीर्ण

माळ उंच-सखल पण तसा पुष्कळसा सपाट आहे. खोलगटीत विखुरलेले पाझर तलावांचे निळे आरसे, त्याभोवतीची शेताची हिरवी कोंदणे, वळणावळणाने जाणाऱ्या, झाडोऱ्याने रेखलेल्या ओढ्यांच्या रेषा आणि या सर्वांना वेढून टाकणारा, गवताचा पिवळा समुद्र असं रूप आहे या नजर गुंतवून ठेवणाऱ्या माळाचं.

"यंदा पाऊस मोप झाला, सर्वे तलाव भरले. नाहीतर एव्हाना तलाव आटायची आणि शेतं सुकायची येळ येती," माझ्याबरोबर फिरायला आलेला किसन धनगर म्हणाला.

तो म्हणत होता, ते बरोबर होतं आणि मलाही ते दिसत होतं. पण चौफेर पसरलेल्या या माळरानाकडे पाहून माझ्या मनात विचार आला, पशुपक्ष्यांसाठी किती छान, अनुकूल मुलुख आहे हा. अशा प्रकारच्या प्रदेशात, आफ्रिका खंडात, कितीतरी प्राणी राहतात. हरणांच्या अनेक जाती, झेब्रा, जिराफ, चित्ता असे कितीतरी. माणसाने कशाला इथं राहायची धडपड करायची ? इथं उन्हाळा आणि हिवाळा दोन्हीही कडक. पाऊस कमी आणि अनिश्चित. त्यामुळे पाण्याचा तुटवडा कायमचा. जमिनीला कस नाही, मातीत वनस्पतींचा अंश नाही. पाणी, ओलावा धरून ठेवण्याची क्षमता तिच्यात नाही. अशा शुष्क प्रदेशात कशाला यावं माणसानं ? इथं अनेक वर्ष राहणारे, उद्योगधंदा करणारे जुवेकर मला म्हणाले, "माणसानं फक्त शहरात राहावं आणि असले भाग जनावरांसाठी मोकळे सोडावेत."

पण इथं तर माणूस शेकडो, कदाचित् हजारो वर्षांपासून राहतोय. गवत खाणाऱ्या, दुभत्या जनावरांना माणसानं आपलंसं केलं, त्या कालापासून. गुरं, मेंढ्या, शेळ्या यांच्या लाखो खुरांनी हा मुलुख हजारो वर्षे धडधडत राहिलेला आहे. पूर्वी यांच्याबरोबर हरणं, काळवीटांसारखी जनावरंही इथं राहत असावी. माणसाच्या पाळीव जनावरांपुढे त्यांचा निभाव लागला नाही. आता इथे शिल्लक आहेत, एखादं चिन्कारा हरीण आणि मेंढ्यांच्या मागावर फिरणारे लांडगे.

समोरून येणारे दोन धनगर पाहून आम्ही थांबलो. त्यांचं मुंडासं, राठ, सुरकुतलेला चेहरा आणि पांढऱ्या भरघोस मिशा पाहून मला व्यंकटेश माडगूळकरांच्या 'बनगरवाडी'ची आठवण झाली. किसननं त्यांना रामराम केला. "बाबा," मी त्यांना विचारलं, "तुम्ही मेंढ्या पाळता का शेळ्या ?"

"जास्त करून शेळ्याच," बाबा उत्तरले, "मेंढ्यांना अलीकडं रोग व्हतोय्."

हा रोग आफ्रिकेकडून आलाय्. त्याचे जंतू पक्ष्यांकडून इथे आले असावेत, अशी परकीय तज्ञांची शंका. ही मला अगोदर मिळालेली माहिती. पण आफ्रिका खंडातून भारतात येणाऱ्या पक्ष्यांची संख्या फारच कमी आहे. कदाचित् आफ्रिकेतून आयात केलेल्या शेळ्यांनीच हे रोगजंतू इथे आणले असावेत, असा माझा अंदाज.

"शेळ्या-मेंढ्यांना खायला काय घालता ?" माझा पुढचा प्रश्न.

"काही नाही ! इथंच चरत फिरतात ती," बाबांचे उत्तर.

"चांगलं असतं हे गवत ?"

"व्हय् की !"

माळावर गवत तरी कोणतं आहे ? मी निरखून पाहतो. हेटेरोपोगॉन कॉन्टॉर्टस् असं शास्त्रीय नाव असलेलं कुसळी गवत. शिवाय ॲरिस्टिडा, स्पोरोबोलस आणि एरॅग्रोस्टिस् या गवतांच्या जाती. माझ्या माहितीप्रमाणे ही सारी गवतं आहेत निकृष्ट. फारशी अन्नद्रव्ये नसलेली. चराऊ जनावरांच्या दृष्टीनं कमी प्रतीची. पण आमच्या धनगरांच्या परिचयाच्या याच जाती आहेत. गेली शेकडो वर्षं चाललेली गुरांची अनिर्बंध चराई, त्यांच्या वाढत्या संख्येचे वाढते दडपणं आणि अधूनमधून लावण्यात येणाऱ्या किंवा लागणाऱ्या आगी, यांच्या एकत्रित परिणामामुळे आमच्या माळरानावर आता याच जाती प्रामुख्याने उरल्या आहेत. डोंगरांत फिरतानाही याच जाती सगळीकडे दिसतात. डोंगरांत गुरं चारणाऱ्या गवळी धनगरांनाही याच जाती महत्त्वाच्या वाटतात. डोंगरउतारांना संरक्षण देऊन उत्कृष्ट जातीच्या गवतांना वाढण्यास वाव दिला की हळूहळू ही निकृष्ट गवतं मागे हटतात. पण गुरं चारणाऱ्यांना ही चांगल्या प्रतीची गवतं कापून न्या म्हटलं तर ते नाखूष असतात, असा माझा अनुभव. एक तर त्यांना चांगली गवतं फारशी माहीतच नसतात आणि कापून नेण्याचे कष्ट करण्यापेक्षा गुरांना चरायला मोकळं सोडणं सोपं असतं !

शतकानुशतकं निकृष्ट जातींचंच गवत आपल्या जनावरांना खायला घालणाऱ्या या धनगरांच्या पर्यावरणीय दारिद्र्यास जबाबदार कोण ? माणसाला जगण्यास अनेक तऱ्हांनी प्रतिकूल असलेल्या या माळावर त्यांना जगावयास भाग पाडणारा इतर समाज; का शैक्षणिक, आर्थिक सुधारणा त्यांच्यापर्यंत न पोहोचविणारे शासन, का प्रचलित शिक्षण घेण्यास, आपल्या पारंपरिक पद्धती बदलण्यास नाखूष असलेला धनगर समाज ? अमर्त्य सेन किंवा अनिल आगरवाल यांपैकी कोणीच या प्रश्नांना उत्तरं दिलेली आढळत नाहीत.

एव्हाना बाबा आपल्या मेंढ्यांमागे वळले होते आणि आम्ही पुढे निघालो होतो. लवकरच आम्ही एका बंधाऱ्यापाशी येऊन पोहोचलो. एक ओढा मातीच्या बंधाऱ्याने अडवून शासनाने या कमी पावसाच्या प्रदेशात पाण्याचा साठा उपलब्ध करून दिला होता. हा पाझर तलाव 'पाणी अडवा, पाणी जिरवा' या योजनेचा भाग होता. तलावामुळे विहिरींना भरपूर पाणी मिळेल, भूगर्भातले झरे जिवंत होतील, अशी अपेक्षा होती. अशा तलावातून पाणी उचलून शेतीला देण्यास सहसा परवानगी दिली जात नाही. इथे मात्र काही पंप चालू होते. पंपाद्वारे पाणी ओढून शेतांकडे वळविले होते, विहिरीत ते ओतण्याचेही काम चालू होते. कदाचित् गावातील काही 'वजनदार' असामींना पाणी उचलण्याची परवानगी मिळाली असावी. कदाचित् परवानगी शिवायही पाणी उचलण्याइतके त्यांचे 'वजन' गावात किंवा शासनात असावे.

तलावाच्या पाण्यानं जी 'शेतं' भिजत होती, त्यांत गहू लावलेला होता, कांदा पिकत होता, सुधारित बोरांची, डाळिंबाची, चिकूची बागायती होती. पाणी आल्यामुळे असेल कदाचित, लोकांनी शेताच्या बांधावर, घराभोवती झाडं लावली होती – निलगिरीची, शेवरीची, लिंबाची, शिसूची, सुबाभळीची. ठिकठिकाणी झाडांचे शेंडे वर उठलेले दिसत होते. तलावाच्या काठाने, ओढ्याच्या कडेने, या कोरड्या माळावर एक नवी सृष्टी तयार होत होती. गवताच्या सागराला डोंगरउतारावर, डोंगराच्या माथ्यापर्यंत पिटाळून लावण्यात माणसाने यश मिळविले

होते. जोपर्यंत पाणी मिळणार होते, तोपर्यंत शेतं पिकणार होती. शेतमाल इथून बाजारपेठेत जाणार होता. एका घरासमोर कांद्याचा ढीग रचलेला होता. तो पाहून आम्ही थांबलो. कांदा ही त्या वेळी दुर्मिळ वस्तू झालेली होती. त्याचे भाव आकाशाला भिडलेले होते. व्यापाऱ्यांनी भरपूर नफा कमाविल्याचे वृत्त होते. पण सरकारने कांदा आयात केला आणि किमती उतरू लागल्या.

"काय भावानं देणार कांदा?" मी तिथं काम करणाऱ्या बाईला विचारलं.

"तीस रुपये किलो!" बाई माझ्याकडे पाहत म्हणाली.

पुण्यात त्या वेळी कांदा १५ ते २० रुपये किलो या भावानं किरकोळीत विकला जात होता. चांगला भाव मिळेल या आशेनं ज्यांनी आता कांदा विकायला काढला, किंवा शेतांत लावला, त्यांना भरपूर नफा कमाविणं आता शक्य नव्हतं. टंचाईच्या जोरावर नफा मिळविण्याचे दिवस संपले होते. ज्यांनी तसा नफा मिळवला, ते बहुसंख्य शेतकरी नव्हते, दलाल होते.

एके काळच्या नापीक, दुष्काळी प्रदेशाचा विकास करण्याचा इथल्या पुढाऱ्यांनी, शासनाने चंग बांधला. बंधारे बांधून, ओढे अडवून पाण्याची सोय केली. शेतीला उत्तेजन दिले, सवलती दिल्या. शेतकऱ्याचे उत्पन्न वाढावे म्हणून नगदी पिकांना, बागायतीला उत्तेजन दिले. रस्त्यांची, वाहनांची सोय झाल्याने शेतमाल बाजारापर्यंत पोहोचला आणि शेतकऱ्याच्या हातांत नगद पैसा खेळू लागला.

पण स्वस्त अन्नधान्य, जळण, चारा, इमारती व शेतीला उपयोगी असे लाकूड या प्राथमिक गरजा कोणी पुरवायच्या? हे शासनाने किंवा शेती तज्ज्ञांनी सांगितलं नाही. हातांत पैसा येऊनही शेतकऱ्याचे, ग्रामीण भागातील रहिवाशांचे, पर्यावरणीय दारिद्र्य कायम राहिले, कदाचित् वाढलेही असावे.

सरकारी धोरणाचा, योजनांचा मुख्य रोख शेतकऱ्याचे उत्पन्न वाढले पाहिजे असाच होता आणि आहे. उत्पन्न वाढले म्हणजे इतर गोष्टी ओघाओघाने येणार आहेत – शिक्षण, आरोग्य, महिलांची उन्नती वगैरे. सरकारने उपलब्ध करून दिलेल्या सोयी म्हणजे एक प्रकारचे 'व्यावहारिक' शिक्षणच आहे. जोपर्यंत सरकारी सवलती, अर्थसहाय्य चालू आहे, तोपर्यंत आर्थिक विकास चालूच राहणार आहे. या सोयी, सवलती, सहाय्य अनंत कालपर्यंत कसे चालू राहील हे पाहण्याचे 'व्यावहारिक' शिक्षण इथे आपोआप मिळतच आहे की! अमर्त्य सेन यांनी या शिक्षणाचा कुठे विचार केला आहे? साक्षरता, मूलभूत शिक्षण, त्याने विकसित होणारी वैचारिक पातळी, हातांत, मेंदूत शिरणारे तंत्रकौशल्य यांचा अर्थाअर्थी संबंध पोहोचतो कुठे इथे?

सामाजिक जाण असणाऱ्यांचा, सामाजिक कार्य करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांचाही मुख्य भर शेतकऱ्याचे, इतर सामाजिक घटकांचे उत्पन्न वाढविण्यावरच आहे. याच्याशी संबंधित सरकारी योजना राबविण्यासाठी तंत्रज्ञान, तंत्रसहाय्य आणि परदेशांतून मदत उपलब्ध करून दिली जात आहे. उत्पन्न वाढण्यासाठी बाजारपेठेशी संलग्न करून घेण्याची सर्वांनाच घाई झाली आहे. कारण त्यामुळे नगद पैसा हातात येणार आहे. समाजकारण आणि राजकारण यांची सांगड घालण्याचा हा सर्वोत्तम मार्ग आहे.

राळेगणसिद्धीचा नाही विकास झाला? आता तिथला शेतमाल पश्चिम आशियातील धनाढ्य अरब देशापर्यंत पोहोचला आहे. अनिल आगरवालही या गोष्टीचा गौरवाने उल्लेख करीत आहेत.

शेतीचा विकास झाला, शेतकऱ्यांच्या हातांत पैसा आला. पण इथल्या धनगरांचे काय? पावसाळा संपला, कोरडा मोसम सुरू झाला की ते नित्यनेमाप्रमाणे इथून स्थलांतर करतील. मेंढ्यांचे कळप घेऊन थेट कोकणात उतरतील, वाटेवर शेतांत मेंढ्या बसवून शेतकऱ्यांना खत पुरवितील. त्यांच्याकडून पोटापुरतं अन्न वसूल करतील आणि पावसाळ्याच्या सुरुवातीला इथे परत येतील. हे चक्र जोपर्यंत बिनबोभाट चालू आहे, तोपर्यंत शाळा-कॉलेजच्या शिक्षणाची त्यांना तरी काय जरूरी आहे? त्या शिक्षणाचा संबंध पोहोचतोच कुठे इथे? त्यांचा हा दिनधर्म, त्यांचे पारंपरिक जीवन, त्यांची संस्कृती अबाधित राहिली पाहिजे, अशी इच्छा अनेक समाजशास्त्रज्ञांनी व्यक्त केली नाही का!

माझ्या मनातले हे विचारचक्र थांबले, जेव्हा मी आणि किसन एका फाटकापाशी येऊन पोहोचलो तेव्हा. हा एक पाळीव जनावरांचा आधुनिक 'फार्म' होता. शास्त्रीय पद्धतीनुसार इथे शेळ्या-मेंढ्यांची पैदास करण्याची सोय होती. परदेशांतून उत्तम जातीच्या बोकडांची आयात करण्यात आली होती. त्यांचा आपल्या उत्तम शेळ्यांबरोबर संकर करून नवीन जाती तयार केल्या जात होत्या. आयात केलेल्या एकेका बोकडाची किंमत लाख रुपयांपर्यंत होती. अर्थातच अशा किमती बोकडांना मोकळं चरायला सोडून निकृष्ट गवत खायला लावणं परवडणारं नव्हतं. त्यांच्यासाठी खास गवत, पाला लावलेला होता. प्रथिनं, जीवनसत्त्वं यांनी युक्त असं खास खाद्य त्यांच्यासाठी तयार केलेलं होतं. त्यांना रोग होऊ नयेत म्हणून औषधं दिली जात होती, खास दक्षता बाळगली जात होती. या प्रयोगात धनगरांना, शेतकऱ्यांना सामावून घेण्याचीही सोय होती. इथे जन्मलेले संकरित बच्चे धनगरांना, शेतकऱ्यांना काही काळ सांभाळण्यासाठी दिले जाणार होते आणि ठराविक काळानंतर त्यांच्याकडून योग्य दराने विकत घेतले जाणार होते. मात्र हा सारा खटाटोप बोकडाच्या मांसासाठी केला जात होता. शक्य तितक्या कमी जोपासना कालात जास्तीत जास्त मांस देणारा बोकड तयार करणे, हे येथे उद्दिष्ट होते.

अर्थात अशा किमती बोकडापासून तयार केलेल्या उच्च दर्जाच्या मांसाची किंमतही भरपूर आणि ते विकले जाण्यासाठी त्याच तोलाची बाजारपेठ लागणार. म्हणजे हे मांस पश्चिम आशिया, पश्चिम युरोप, अमेरिका यांतल्या धनाढ्य देशांना निर्यात केले जाणार किंवा आपल्याकडील धनिक वर्ग, महागडी हॉटेलं यांना पुरविले जाणार.

इथला प्रयोग पाहून माझ्या मनात विचार आला, आर्थिक विकासाचे ध्येय कोणते असावे? बाजारपेठेच्या मागण्या पुरविण्याचे, का स्वतःचा विकास साधण्याचे? ज्यांच्याकडे माल खरेदी करण्याची ऐपत आहे, अशांच्या मागण्या बाजारपेठ पुरवीत असते. ही ऐपत सर्वसामान्य जनतेकडे असेल तर त्यांच्या गरजा बाजारपेठ पुरवू शकेल. ही ऐपत मूठभर लोकांच्या हातांत केंद्रित झालेली असेल तर बाजारपेठ मूठभर श्रीमंतांसाठीच असेल. सर्वसामान्यांच्या, सर्वसामान्य वस्तूंच्या गरजा ती

पुरवू शकणार नाही.

अमर्त्य सेन म्हणतात की, सरकारचा बाजारपेठेतील हस्तक्षेप असा हवा की ती सर्वसामान्यांच्या गरजा पुरविण्यास समर्थ होईल. अशा प्रकारचा हस्तक्षेप करून चीनने आपली प्रगती साध्य केली आहे, असे त्यांचे मत आहे. भारतामध्ये मात्र सरकारी निर्बंध आणि हस्तक्षेप त्यांच्या मते असे आहेत की बाजारपेठेचे कार्य योग्य प्रकारे चालत नाही आणि त्यामुळे मूठभर श्रीमंतांचाच फायदा होतो. सर्वसामान्य जनतेची शैक्षणिक, बौद्धिक, वैचारिक, तंत्रज्ञानात्मक पातळी जेव्हा उंचावेल तेव्हाच शासनाला सार्वजनिक हितासाठी बाजारपेठेला अंकित करण्याचे धैर्य आणि शक्ती प्राप्त होईल. ही स्थिती अमेरिकेसारख्या संपन्न राष्ट्रालाही अजून प्राप्त करून घेता आलेली नाही. तिथल्या बाजारपेठेवर काही थोड्या बहुराष्ट्रीय कंपन्या वर्चस्व गाजवीत असल्याची तक्रार नेहमी कानांवर येते.

फलटणच्या माळावर विकासाचे जे प्रयोग मी पाहिले त्यांच्यामुळे सर्वसामान्य जनतेची शैक्षणिक, बौद्धिक वगैरे सर्व प्रकारची क्षमता वाढेल का, हा प्रश्न मी मनात घोळवीत होतो. चालू प्रयत्नांनी ती तशी वाढणार नसेल तर दुसऱ्या कोणत्या तरी प्रकारचे प्रयोग करून पाहायला हवेत.

तसं पाहिलं तर हवापाण्याच्या दृष्टीने हा प्रदेश माणसाला सुखाने राहण्यास अनुकूल नाही. इथले कित्येक भाग असे आहेत की तिथे मनुष्यवस्ती नाही. तिथे माणसाचा हस्तक्षेप अजिबात थांबविला तर? वन्य प्राण्यांची, स्थानिक वनस्पतींची संख्या वाढेल. माणसाच्या भविष्यकालीन उपयोगासाठी एक प्रकारचे जैविक धन इथे तयार होईल. वन्य प्राण्यांसाठी निरनिराळे आसरे तयार करून या प्रदेशातील नैसर्गिक विविधता आकर्षक करण्याचाही प्रयोग इथे करून पाहता येईल. इथल्या स्थानिक वनस्पती, पशु-पक्षी यांच्या नैसर्गिक पुनरुज्जीवनाचा प्रयोग इथे का करून पाहू नये? त्यात स्थानिक तरुणांना सामील करून घेता येईल. स्थानिक निसर्गाचे निरीक्षण, त्याच्या पुनरुज्जीवनाचे प्रयोग, निसर्गाचे व्यवस्थापन आणि त्यातून योग्य तेवढाच फायदा उठविण्याचे शिक्षण यांच्याद्वारे त्यांची बौद्धिक व नैतिक पातळी, तांत्रिक क्षमता वाढविता येईल. आवश्यक तेवढ्या मर्यादित क्षेत्रावर असा प्रयोग का करून पाहू नये?

एखाद्या समाजाने स्वतःची आर्थिक क्षमता वाढवायची कशी? बाजारपेठेशी स्वतःला बांधून घेऊन, का स्वतःची आणि परिसरातल्या निसर्गसंपत्तीची क्षमता वाढवून? पहिला मार्ग हा आजचा सर्वमान्य मार्ग आहे. राजकीय, शासकीय, सामाजिक अशा सर्व स्तरांवर त्याला मान्यता आहे. मला मात्र दुसरा मार्गच महत्त्वाचा वाटतो. ॲडम स्मिथ, जॉन मेनर्ड केन्स अशा मोठ्या अर्थतज्ज्ञांनीही याच मार्गाची प्रशंसा केली आहे. चिरंजीवी विकास ही आजची संकल्पनाही याच मार्गाने साध्य होऊ शकते. अमर्त्य सेन यांनी मात्र या विषयावर आपले विचार प्रकट केलेले अजून माझ्या वाचनात आलेले नाहीत.

खरं तर राळेगणसिद्धीत या मार्गाने वाटचाल सुरू झाली होती. स्थानिक निसर्गाची क्षमता वाढविण्याच्या दृष्टीने पावलं टाकण्यात आली. पुढे मात्र जास्त लक्ष लागले बाजारपेठेकडे आणि पहिला प्रयोग अर्धवटच राहिला. फलटणच्या माळावरही अशा प्रकारचा प्रयोग एकदा सुरू करण्यात आला होता. पण त्याचे महत्त्व कोणाच्या लक्षात आले नाही आणि लोकांचे सहकार्य त्याला मिळाले नाही.

माझ्या सभोवती कितीतरी पाझर तलाव मी पाहतोय. यांपैकी एखाद्या तलावाच्या पाण्यावर माणसाच्या प्राथमिक गरजा भागविण्यासाठी उत्पादन का करता येऊ नये? असं उत्पादन आळीपाळीनं करायला, गावांना तयार का केलं जाऊ नये? असं उत्पादन करायचं म्हणजे काय करायचं? कमी पावसाच्या या उष्ण प्रदेशात उत्तम तऱ्हेने वाढू शकणाऱ्या वनस्पती म्हणजे गवत आणि काही काटेरी झुडुपं व झाडं. उदाहरणार्थ, नीम (लिंब), बाभूळ, बोर, खैर, पिलू (सॅल्व्हॅडोरा), नेपती (कॅपॅरिस) वगैरे. उत्तम जातीच्या गवतांची कुरणे (पाश्चर) जोपासणे, नीम, खैर, बाभूळ यांच्या राया तयार करणे, पाझर तलावामुळे तयार होणाऱ्या जलमय भूमी (वेटलॅन्ड) वर पाणवनस्पती आणि मासे यांची वाढ करणे आणि या सर्व गोष्टींसाठी मुख्यतः पाण्याचा वापर करून चारा, जळण, इमारती व अन्य उपयुक्त लाकूड यांच्या प्राथमिक गरजा भागविणे. दुभत्या जनावरांपासून मिळणारे दूध व शेण यांच्या गावाच्या, समाजाच्या गरजा प्रथम भागवून उरलेले बाजारात पाठविणे.

खरोखर, सहकारी तत्वाचा असाच उपयोग महात्माजी आणि त्यांच्याबरोबरच्या कार्यकर्त्यांना अभिप्रेत होता. पुढे मात्र सहकारी सोसायट्यांचा रोख मुख्यतः बाजारातली मागणी पुरविण्याकडे वळला. सहकारी तत्वावर निघालेले साखर कारखाने हे याचे ढळढळीत उदाहरण!

खरं तर बाजारपेठेशी केव्हा संलग्न स्वतःला होऊ द्यायचं हे ठरविण्याचा अधिकार/हक्क प्रत्येक गावाला-समाजाला हवा. मात्र त्यासाठी गावातील जनतेची शैक्षणिक, बौद्धिक, नैतिक पातळी एका विशिष्ट उंचीपर्यंत जायला हवी. एके काळी अण्णासाहेब हजाऱ्यांनी स्वतःच्या उदाहरणाने ही पातळी उंचावली होती. सर्व ठिकाणी हे शक्य नाही. योग्य शिक्षणाने मात्र हे साध्य होऊ शकेल.

एकदा बाजारपेठेशी गाव जोडले गेले की प्राथमिक गरजा पुरविणाऱ्या वस्तू गावाकडून शहराकडे जाऊ लागतात. गावात त्यांची टंचाई जाणवू लागते. शहरांकडून या वस्तू कधीच गावाकडे येऊ शकत नाहीत. गावात कारखानदारी आली तर प्राथमिक गरजेच्या वस्तूंची टंचाई आणखीनच तीव्र होते. सुपीक जमीन, मोकळी जमीन, सुपीक माती (पोयटा), शुद्ध पाणी, शुद्ध हवा, सकस अन्न, चारा, जळण, लाकूड या सर्व गोष्टी दुर्लभ होतात. त्यांच्या किमती वाढतात. सर्वसामान्यांचे उत्पन्न या प्राथमिक गरजेच्या वस्तू घेण्यातच खर्च होते. कारखान्यात तयार होणाऱ्या, दुय्यम गरजेच्या वस्तू विकत घ्यायला त्यांच्या हातांत पैसा उरत नाही. मग औद्योगिक क्षेत्रातही मंदी येते.

प्राथमिक गरजेच्या वस्तूंचा पुरवठा कोणी करायचा? हा प्रश्न अमर्त्य सेन यांना पडला असेल का? फलटणच्या माळाला भेट देण्याची वेळ त्यांच्यावर आली तर या प्रश्नाची उकल ते करतीलही. मला मात्र राहून राहून वाटत होतं की देशाचं भलं चिंतणाऱ्या प्रत्येकानं फलटणच्या माळावरील टेंगळावर उभं राहून सभोवार नजर फिरवायला हवी. ■

प्रकाश गोळे, १/ब अभिमानश्री सोसायटी,
पाषाण रस्ता, पुणे ४११००८.